किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● टप्पा

५● कलेचा शोध...बोध

१२● कपीची पाऊले

१६● वाटचाल दोन तपांची...

१९● जिकडेतिकडे

२५● स्मरण, प्रेरक आणि मार्गदर्शक बोलांचे...



**खंड १४ : अंक ५ ऑगस्ट २०१५**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,

९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,

(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७

ई-मेलः- ispe@vsnl.net

website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**

**खंड १४ (अंक ५) ऑगस्ट २०१५**

**संपादक - अभय टिळक**

**निर्मिती-सहभाग - गिरिजा देशमुख**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# टप्पा

जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आपल्या देशाने परिवर्तनाचा एक मोठा टप्पा पार केला. मजेची आणि तितकीच नवलाईची गोष्ट म्हणजे छापील माध्यमांपासून ते अवाढव्य विस्तारलेल्या दृक्-श्राव्य माध्यमांच्या पसा-यातील कोणीही त्या टप्प्याची दखल घेतली नाही. १९९१ सालापासून आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये साकारत असलेल्या आर्थिक पुनर्रचना पर्वाने २४ जुलै २०१५ रोजी २४ वर्षांची वाटचाल पूर्ण करून २५व्या वर्षात पदार्पण केले. १२ वर्षांच्या कालावधीला आपण 'तप' असे संबोधतो. इथे तर २४ वर्षे पूर्ण झाली ! म्हणजेच, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अवतरलेल्या आर्थिक पुनर्रचना पर्वाने दोन तपांची वाटचाल पूर्ण केली. भाषिक, प्रांतिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, पंथीय अशा विविध बाबींमध्ये उदंड भिन्नता असलेल्या आपल्या समाजात आर्थिक पुनर्रचना पर्वाने अडत-अडखळत-रखडत का होईना पण २४ वर्षांची वाटचाल मागे टाकावी हे लहानसहान यश म्हणता येत नाही. हे एक आश्चर्यच गणले पाहिजे. २४ जुलै १९९१ या दिवशी, पंतप्रधान नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळातील अर्थमंत्री या नात्याने डॉ. मनमोहनसिंग यांनी संसदेमध्ये जो अर्थसंकल्प सादर केला त्या अर्थसंकल्पाद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक पुनर्रचनेची दमदार सुरुवात झाली, असे आपण म्हणतो. २४ जुलै १९९१ ते २४ जुलै २०१५ हा दोन तपांचा कालावधी आपल्या देशाच्या दृष्टीने एकंदर तिहेरी संक्रमणाचा ठरला. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अशा तीनही आघाड्यांवर आपल्या समाजात जवळपास समांतर पद्धतीने अतिशय मूलभूत अशा प्रकारच्या परिवर्तनाला प्रारंभ झाला. गेल्या २४ वर्षांत केंद्रात सरकारे बदलली, युत्या-आघाड्यांच्या सरकारांचे पर्वही नांदून गेले. या सगळ्याचा परिणाम आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा तपशील, अंतरंग व जडणघडण यांवर होणे स्वाभाविकच होते. असे असले तरीही त्या सगळ्या संक्रमणादरम्यान पुनर्रचना पर्वाच्या प्रवासाची दिशा मात्र बदलली नाही, ही बाब अधोरेखित करावयास हवी. आर्थिक पुनर्रचनेच्याबाबतीत आपल्या देशाची तुलना चीनबरोबर करण्याचा अनेकांना मोह होत असतो. परंतु, अशी तुलना अप्रस्तुत आणि अनाठायी ठरते, याची जाणीवही बहुतेकांना नसते. चीनमध्ये नांदते आहे ती कम्युनिस्ट पक्षाची पोलादी शासनपद्धती. तर, आपल्या देशात कारभार चालतो तो जागरूक व संवेदनशील लोकतंत्राचा. अशा परिस्थितीत आर्थिक पुनर्रचना पर्वाचा दोन तपांच्या वाटचालीचा टप्पा ओलांडला जावा ही बाब स्पृहणीय ठरते. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या उदयकाळी भारतीय समाजामध्ये पुनर्रचनेसंदर्भात कशा प्रकारची मानसिकता सर्वसामान्यपणे नांदत होती त्याचा थोडक्यात आढावा घेणारा एक छोटेखानी लेख या अंकात सादर केलेला आहे तो या दोन तपांच्या वाटचालीचे औचित्य साधूनच. जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत प्रगतीचे असेच वेगवेगळे टप्पे आपण गाठत असतो. मानवी उत्क्रांतीच्यासंदर्भातील संशोधनांच्या अशाच दोन टप्प्यांवर प्रकाश टाकणारे या अंकातील साहित्यही विलक्षण वाचनीय ठरावे. ■■



**वाचकांना विनंती**

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

**निवेदन**

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

पुरातत्त्व

# कलेचा शोध.....बोध

उत्क्रांतीच्या प्रक्रियेत माणसाच्या शरीराबरोबर त्याचे मन आणि वर्तनही उत्क्रांत होत गेले, त्यांचा विकास होत गेला. आधुनिक मानवाचा कलाविष्कार हा देखील या बदललेल्या वर्तनाचाच आविष्कार आहे. जीवनासाठी कला की कलेसाठी कला हा चिरंतन वाद खूप अलीकडचा! पण ही कलानिर्मिती कोणत्या प्रेरणेतून झाली असावी, अमूर्ततेपर्यंतचा तिचा प्रवास कसा झाला असावा, या गोष्टींविषयीची उत्सुकता संशोधकांना गेली कित्येक वर्षे लागून राहिली आहे.

आधुनिक चित्रकलेचा उदय हा युरोपामध्ये झाला असे मानले जाते. येथे आढळणारी अद्‌भूत शीलाचित्रे, कोरीवकामाचे अगणित नमुने, शिल्पपट, प्राचीन मानवी वसाहतींचे पुरावे यामुळे युरोपला चित्रकलेची जन्मभूमीच मानले गेले. पुरावशेषांमधून पुढे येणारी ही कला प्रगल्भ आहे, सर्जनशील आहे आणि मुख्य म्हणजे काहीशी अमूर्त स्वरूपाची आहे. सर्वांत प्राचीन पुरावे साधारण ४० हजार वर्षांपूर्वीचे आहेत. आफ्रिका खंडातून माणूस बाहेर पडला, जगभर विस्थापित झाला. त्याच्या या प्रवासात त्याने उत्क्रांतीचा पुढचा टप्पा गाठला आणि त्याचे आधुनिक मानवात रूपांतर झाले. युरोपात आढळणारे कलेचे नमुने त्याच्या या आधुनिकपणाची साक्ष देतात. त्यामुळेच, युरोपच्या भूमीवर ही कला अवतीर्ण झाली त्या घटनेला 'सृजनाचा विस्फोट' असे म्हटले गेले. या काळात चित्रकला, शिल्पकला, कलात्मक दागिने घडवण्याची कला वेगाने विकसित झाली. कलेला सांकेतिक अर्थही (Symbolic meaning) याच काळात प्राप्त झाला. त्यामुळे मानवी उत्क्रांतीच्या टप्प्यातील हा काळ आजवर अभिजात आणि अमूर्त कलेच्या उगमाचा काळ मानला गेला. पण मानवी उत्क्रांतीची प्रक्रिया अत्यंत धीम्या गतीने होत असताना कलेचे हे क्रांतिकारी वळण आले कसे, असा प्रश्न आजवर संशोधकांना पडत असे. कोणत्याही



अमूर्त कलानिर्मितीसाठी मानवी मेंदू बराच प्रगत असावा लागतो. त्यामुळे माणूस युरोपात आला तेव्हा त्याच्या मेंदू आणि जनुकांमध्ये असेच क्रांतिकारी बदल झाले असावेत आणि त्यामुळे त्याची आकलनक्षमताही वाढली असावी, असे निष्कर्ष आजवर काढले गेले.

पण गेल्या काही वर्षांत स्पेनपासून चीनपर्यंत आणि दक्षिण आफ्रिकेपासून ऑस्ट्रेलियापर्यंत जगभर विखुरलेल्या पुरातत्त्वीय पुराव्यांमधून खूप वेगळी कहाणी पुढे येत आहे. या पुराव्यांनी आपल्या आजवरच्या समजांना चुकीचे ठरवले आहे. प्रगत मानवी अवस्थेच्या आधीचा (Homo Sapiens) मानव म्हणजे आपल्या दृष्टीने वानराची केवळ थोडी उत्क्रांत अवस्था होती. पण लाखो वर्षांपूर्वीच्या या पुराव्यांनी पाषाण युगाच्याही आधीच्या काळातील माणसाच्या विकसित आणि आधुनिक मनाचे दर्शन घडवले आहे. जर कलेतील आधुनिकतेचे वळण हे माणसाने एक लाख वर्षांपूर्वी आफ्रिका सोडून युरोपमध्ये आल्यावर झालेल्या जनुकीय बदलांची परिणती असेल, तर हा बदल खुद्द आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, आशिया आणि अमेरिकेतील माणसांमध्ये कसा काय घडून आला? कारण त्या वेळी युरोपमधील माणसाचा त्याच्या इतर बांधवांशी असलेला ऋणानुबंध केव्हाच संपुष्टात आला होता. याचा सरळ अर्थ असा की, आपले पूर्वज आफ्रिका सोडण्यापूर्वीच प्रगत झाले होते. याबद्दलचा पुरावा मात्र आपल्याला आजवर मिळत नव्हता. त्यामुळे कला ही युरोपभोवतीच फिरत राहिली होती.

Sally McBreaty आणि Alison Brooks या मानववंशशास्त्रज्ञांनी मात्र त्यांच्या 'The Revolution that Wasn't' या लेखातून पूर्वीच कलेविषयीच्या या 'युरोपकेंद्री' मानसिकतेवर हल्ला चढवला होता. आफ्रिकेतील मध्य पाषाणयुगीन पुरातत्त्वीय पुराव्यांचा त्यांनी अभ्यास केला. दक्षिण आफ्रिकेतील अलीकडच्या उत्खननांच्या नोंदी घेतल्या. त्यांतील रंगाचा वापर, कोरीव कामाचे नमुने, हाडांचा वापर करून केलेल्या निरनिराळ्या वस्तू अभ्यासल्या. हे सर्व पुरावे किमान दीड लाख वर्षांपूर्वीचे होते. त्यांच्या टीकेमुळे अनेकांचा या विषयाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. गेल्या दहा वर्षांत तर या संदर्भातील अनेक पुरावे मिळाल्याने नवीन गोष्टी प्रकाशात आल्या. दक्षिण आफ्रिका, चीन, स्पेन येथील अलीकडे मिळालेल्या

पुराव्यांमध्ये शहामृग पक्ष्यांची शोभिवंत अंडी, निरनिराळ्या प्रकारचे भौमितिक आकार, व्यक्तिगत वापराचे दागिने अशा वस्तू मिळाल्या आहेत. हे सर्व नमुने ५० हजारपेक्षा जास्त वर्षांपूर्वीचे आहेत. पक्ष्यांच्या पिसांपासून, वाळूपासून बनवलेल्या अनेक वस्तू काळाच्या ओघात नष्ट झाल्या असाव्यात असा ब-याच संशोधकांचा अंदाज आहे. Homo Sapiens च्या आधीच्या टप्प्यातील माणसांनी म्हणजे Neanderthals नी कलेमध्ये काही प्रयोग केले, ते दाखवणारे पुरावेही स्पेनमधील El Castillio गुंफांमध्ये मिळाले आहेत. फ्रान्समधील Pench de I'Aze या गुहेमध्ये Neanderthals नी वापरलेली मँगनीजची रंगद्रावणे मिळाली आहेत. दक्षिण आफ्रिकेतील Witwatersrand विद्यापीठातील Christopher Henshilwood म्हणतात की, या लोकांनी या रंगांचा उपयोग भिंती रंगवण्यासाठी केला की शरीर रंगवण्यासाठी केला हे ठोस सांगता येत नाही. पण रंगांचा आस्वाद घेण्याइतपत त्यांचा मेंदू प्रगल्भ होता हे निश्चित. त्या अर्थाने ते आधुनिकतेच्या वाटेवर होते.

फ्रान्समधील आणखी एका गुहेत Neanderthals चे वास्तव्य असल्याचे पुरावे २०११ साली मिळाले आहेत. दातांना आणि हाडांना भोके पाडून तयार केलेले बरेच शोभिवंत दागिनेही या गुहेत मिळाले आहेत. हे दागिने त्यांच्या आधुनिक संस्कृतीची साक्ष देत आज हजारो वर्षे टिकून आहेत. अशा प्रकारच्या कलेच्या निर्मितीसाठी मेंदूतील आणि जनुकांतील कोणते बदल कारणीभूत ठरले असावेत याचा अभ्यास आता संशोधक करत आहेत. स्टॉकहोम विद्यापीठातील Johan Lind हे जनुकांचा अभ्यास करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संगणक प्रणालीचा वापर करून कलानिर्मितीसाठी असा कोणता जनुकीय बदल झाला असावा, याचा अभ्यास करत आहेत. याच संगणकप्रणालीचा वापर करून त्यांनी FOXP2 या भाषिक विकासाशी निगडीत असलेल्या जनुकामुळे स्वरमार्गात (Vocal Tract) बदल झाल्याचे सिध्द केले आहे.

प्राचीन कलेचे पुरावे, संशोधकांचा अभ्यास यातून एक गोष्ट मात्र निश्चितपणे सिध्द होते की, सांकेतिक किंवा अमूर्त विचार करण्याची क्षमता आपल्या पूर्वजांमध्ये त्यांनी आफ्रिका सोडण्यापूर्वीच विकसित झाली होती. पण हे पुरावे मिळाले तरी सृजनाच्या विस्फोटाच्या रहस्याची



उकल मात्र होत नाही. कलेचा विकास ही जर उत्क्रांतीतून घडलेली प्रक्रिया असेल तर तिची सुरुवात कुठे, कशी आणि का झाली असेल हा प्रश्न उरतोच. आपल्या पूर्वजांच्या सुरुवातीच्या काळातील प्रयत्नांनंतर त्यांची कला अधिकाधिक व्यामिश्र का बनत गेली असावी?

या संदर्भात Johan Lind म्हणतात, "नवीन संस्कृती घडविण्यासाठी अनेक संस्कृतींचा संकर व्हावा लागतो." एक शक्यता अशी आहे की, युरोपमध्ये पोचल्यावर Homo Sapiens च्या (४० हजार वर्षांपूर्वीची उत्क्रांतीची अवस्था) संख्येत कमालीची वाढ झाली असावी. हिमयुगाच्या मध्यावर जी हवामानाची परिस्थिती होती, ती या वर्तनाला कारणीभूत ठरली असावी. त्या पर्यावरणाने या भागातील लोकांना अधिक दक्षिणेकडे ढकलले असावे. त्यामुळे ते एकमेकांच्या जास्त जवळ आले असावेत. लोकसंख्येच्या त्या वाढीमुळे सामाजिक वातावरणात मूलभूत बदल घडवून आणले असावेत. संख्या वाढल्याने लोक मोठ्या समूहाने एकत्र राहू लागले असावेत. त्यांचे सामाजिक जाळेही विस्तारले असावे. वेगवेगळ्या समूहांचे लोक एकत्र आल्याने त्यांच्या मूळ समूहाच्या जागी या मोठ्या समूहगटाची ओळख निर्माण करण्याची गरज पडली असावी. या पार्श्वभूमीवर समूहांतर्गत देवाण-घेवाणीसाठी, सुसंबंध प्रस्थापित करण्यासाठी नवी सांकेतिक भाषा, लिपी, चित्रभाषा (Artistic vocabulary) विकसित करण्याची गरज भासली असावी. ही नवी शैली या लोकांच्या आधीच्या समूहाच्या शैलीतील खुणांचा, चित्रांचा संकर असावी. एखादा समूह एखाद्या गुहेत वास्तव्याला आहे हे दुस-या समुहाला कळावे यासाठी त्या समूहाची ओळख दर्शवणारी ही चित्रे त्या गुंफांच्या भिंतींवर रेखाटली गेली असावीत.

सतत बदलणा-या या प्रेरकशक्ती लक्षात घेतल्या, समजून घेतल्या तर या कलाकृतींचा अन्वय लावणे आपल्याला शक्य होईल. ब-याच प्राचीन गुंफांमधील चित्रांत असे दिसून आले आहे की, सुरुवातीच्या काळातील चित्रे, खुणा, चिन्हे ही ठराविक आकृतीबंधात रेखाटलेली नाहीत. पण साधारण २० हजार वर्षांपासून या खूणा समूहरूपाने, ठराविक रचनेत रेखाटल्या जाऊ लागल्या. याचा अर्थ असा की, या काळापर्यंत या प्रदेशातील लोकांची वेगळी शैली, ओळख प्रस्थापित झाली असावी. वेगवेगळ्या गुंफांमधील

या चित्रांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचना कालांतराने परंपरा बनल्या असाव्यात आणि ही परंपरा एका पिढीकडून दुस-या पिढीकडे हस्तांतरीत केली जात असावी.

माणसाला व्यक्त होण्याकरता रंगांचा वापर करून खुणा, चित्रे का काढावीशी वाटली, त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यातील कला कालांतराने कशी विकसित होत गेली, हे माहिती करून घेणे खूप रंजक आणि उद्बोधक आहे. निसर्गात भरलेले रंग पाहून माणसामध्ये रंगांविषयीच्या जाणिवा निर्माण झाल्या असाव्यात. सुरुवातीच्या काळातील रंगकामासाठी त्याने गेरु , कोळसा यांचा वापर केला याचे पुरावे आहेत. गेरूची आणि मँगनीजची रंगद्रावणे अनेक गुंफांमध्ये मिळाली आहेत. शरीर सुंदर बनवण्याचे आकर्षण माणसाला पहिल्यापासूनच असावे. त्यामुळे त्याने या रंगांचा वापर सुरुवातीला भिंतींवर न करता स्वतःचे शरीर रंगवण्यासाठी केला. त्या अर्थाने माणसाचा सर्वांत पहिला कलेचा आविष्कार मानवी देहाचे सुशोभीकरण हा होता. आजची सौंदर्य प्रसाधने, टॅटू, मेंदी ही शरीर रंगवण्याच्या त्या आवडीतूनच जन्माला आली असावीत. रंगांबरोबरच शरीर नटवण्यासाठी मण्यांचा, दातांचा किंवा हाडांचा वापरही याच काळात केला गेला असावा. हाडांना, दातांना भोके पाडून त्यांचे दागिने बनवणे ही त्या पुढची पायरी असावी. एखाद्या गोष्टीला भोके पाडून, त्यातून कलात्मक वस्तू घडवून ती परिधान करण्याने शरीराची शोभा वाढते ही समज येण्याकरता मेंदूचा विकास व्हावा लागतो. पण, त्याहीपेक्षा अधिक विकास ज्या साहित्यापासून ती कलानिर्मिती होते, त्या साहित्यात दडलेले कलात्मक मूल्य ओळखण्यासाठी व्हावा लागतो. शरीराच्या या रंगरंगोटीला, दागिन्यांना परंपरा, विधी, सामाजिक प्रतिष्ठा यांचे पदर नंतर चिकटले गेले असावेत. पण त्यांच्या वापरातून माणसाच्या कलात्मक जाणिवा हळू-हळू संपन्न झाल्या असाव्यात.

कलेच्या पुढच्या टप्प्यात माणूस आपल्या शरीराऐवजी गुहांच्या भिंतींवर किंवा गारगोटीसारख्या दगडावर चित्रे काढू लागला. सुरुवातीची ही चित्रे म्हणजे नागमोडी रेषा, एकमेकांना छेदणा-या रेषा, समांतर रेषा किंवा इंद्रधनुष्यासारखे कमानींचे आकार अशा स्वरूपाची होती. या प्रकारची



चित्रे युरोपातील काही गुंफांमध्ये आढळतात. ही चित्रे मध्य आणि उत्तर Palaeolithic काळातील आहेत. या चित्रांतील आकार हे ठरवून घडवल्यासारखे आहेत. म्हणजे हे आकार कुठेतरी बघितले आणि त्याबरहुकूम चितारले असे झाले असावे. एखादा विशिष्ट आकार बघून तो चित्रात उतरवायचा, तर त्याची रचना समजून घेण्यासाठी आकलन सक्षम असावे लागते आणि तो डोक्यात ठेवून नियोजनबध्द काम करावे लागते. या काळातील मानव आकलनदृष्ट्या किती समृध्द होता याचे पुरावे ही चित्रे देतात. या चित्रांना सांकेतिक अर्थ नंतरच्या काळात प्राप्त झाले असावेत.

द्विमिती चित्रांचा विकास होत असतानाच दुस-या बाजूला माणूस त्रिमितीय शिल्पे, मूर्ती घडवू लागला. अर्थात, सुरूवातीच्या काळात त्याने घडवलेल्या शिल्पांना ठराविक आकार नव्हता. एखाद्या दगडात किंवा लाकडात निसर्गातील विविध आकार सूचकपणे व्यक्त झालेले त्याला दिसले आणि मायकेल एंजलो म्हणतो तसे ("I saw an angel in the marble and carved until I set him free.") त्याने त्या आकारांना दगडातून किंवा लाकडातून उठाव देण्याचा प्रयत्न केला असेल. अशा प्रकारच्या त्रिमितीय कलेचे २,५०,००० ते २,८०,००० वर्षांपूर्वीचे नमुने उत्खननात सापडले आहेत. ते Homo Heidelbergensis च्या काळातील आहेत. (Homo Erectus नंतरची अवस्था).

या प्रकारच्या कलेचा नमुना मोरोक्को येथे मिळाला आहे. एका ५.८ सेंटिमीटरच्या दगडी तुकड्यात थोडे बदल करून त्यात केसांचा आकार, शरीर आणि पायांचा आकार दाखवले आहेत. समोरची बाजू मँगनीजने रंगवली आहे. त्या दगडी तुकड्यातील कलात्मक मूल्य पाहून पाषाणयुगीन मानवाने त्याला मानवी आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रक्रियेला Proto-creative प्रक्रिया असे म्हणतात. द्विमिती चित्रांच्या साहाय्याने त्रिमिती कला घडवायला उच्च आकलनक्षमता लागते. अशी अकलनक्षमता आपल्यापैकी काहीच जणांकडे असते. आपल्या या पूर्वजांकडे अशी उच्च आकलनक्षमता असण्याची शक्यता नव्हती. आपल्याला काय घडवायचे आहे याची मूर्त कल्पनाही त्यांना नव्हती. पण आजूबाजूला असलेल्या गोष्टी डोळ्यासमोर ठेवून, त्यांच्यासारख्याच वस्तू घडवण्याचा,

त्यात काही बदल करून ती आणखी चांगली करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून कला अधिकाधिक विकसित होत गेली. विकासाच्या या प्रक्रियेत माणसाची निर्मितीक्षमता वाढत गेली. सूचक आकारातून शिल्प घडवण्याच्या टप्प्यावरून तो आणखी पुढे सरकला. आता त्याच्यासमोर कोरा कॅनव्हास होता. त्यावर आपल्या कल्पनाशक्तीच्या साहाय्याने त्याला त्याच्या मनातील चित्रांना मूर्त रूप द्यायचे होते. अशा प्रकारचे चित्र काढायचे तर त्यासाठी मज्जारचनेमध्ये प्राथमिक स्वरूपाचे बदल होणे आवश्यक असते. त्यामुळे आपली ग्रहणपध्दती बदलते. मेंदूच्या दृश्यस्मृती उत्क्रांत होण्याची ही अवस्था असते. या टप्प्यावर माणसाच्या मोठ्या मेंदूच्या रचनेत बदल झाले. त्यामुळे माणसाच्या दृश्य जाणिवांत बदल झाला. एकीकडे शरीररचनेमध्ये हे बदल होत असताना दुसरीकडे कलेचा प्रवाह वाहता राहिला आणि सांस्कृतिक परंपरा घडत गेली.

कलेच्या विकासाबरोबरच शिकारीच्या आणि इतर साधनांचाही विकास होत गेला. Homo Erectus आणि Homo Heidelgensis यांच्या काळातील साधने अगदीच प्राथमिक अवस्थेतील आहेत. पण माणसाने Homo Sapiens चा टप्पा गाठल्यानंतर तो त्रिमिती साधने बनवू लागला आणि त्यांचा खुबीने वापरही करू लागला. त्याचे हस्तकौशल्य सुधारले.

पुरातत्त्वीय अवशेषांमधून कलानिर्मितीच्या खूप वेगवेगळ्या शैली समोर येतात. कलेबरोबर शैलीचाही विकास होत जातो. सरणा-या काळानुसार येणा-या नवीन पिढ्या, त्यांच्या बदललेल्या जाणिवा, बदलती संस्कृती, हवामानातील बदल, उपलब्ध साहित्य, तांत्रिक कौशल्ये, प्रतिभावान कलाकार यांच्यामुळे कला सतत नवनवीन वळणे घेत जाते. कलेच्या उत्क्रांतीच्या इतिहासात आजवर अशी अनेक वळणे आली आणि इथूनही पुढे ती येतच राहणार आहेत. फरक फक्त एवढाच की, आजवर मेंदूच्या वर्तनाविषयी अनभिज्ञ असलेला माणूस आता त्याच्या आकलनाचा, वर्तनाचा अभ्यास करत आहे. या अभ्यासाला जनुकीय संशोधनाची जोडही आता मिळाली आहे. त्यातून कलानिर्मितीच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश पडत आहे. ब-याच प्रश्नांची उत्तरे मिळू लागली आहेत. त्यामुळेच या विषयातील जिज्ञासाही दिवसेंदिवस वाढत आहे. ■■



पुरातत्त्व

# कपीची पाऊले

उत्क्रांतीच्या प्रक्रियेत प्रगत मानव (Homo Sapien) जन्माला येण्याच्या आधीची माणसाची अवस्था Neanderthal या नावाने ओळखली जाते. या अवस्थेतील मानवाने त्याचा आदिमतेचा टप्पा नुकताच कुठे ओलांडला होता आणि तो आधुनिक मानव बनण्याच्या उंबरठ्यावर होता. एका अर्थी तो संक्रमणाच्या काळातून जात होता. शारीरिक विकासाबरोबर मानसिक आणि भावनिक विकासाच्याबाबतीत तो आधुनिक मानवापासून मैलोगणती दूर होता. त्याची आदिमतेची लक्षणे अजून पुरती गळून पडायची होती. हा मानव नक्की कसा होता याबद्दलचे काही पुरावे मिळाले असले तरी हे पुरावे त्याचे वर्तन, जीवन जगण्याची पध्दती, त्याची स्वभाववैशिष्ट्ये यांवर म्हणावासा प्रकाश टाकत नाहीत. त्यालाही आपल्यासारख्याच भाव- भावना होत्या का, त्याच्या जीवनातील दुःखद घटना त्याला उदास बनवत असतील का, तो कुटुंबवत्सल होता का, इतकेच काय तो आजच्या माणसासारखा प्रेमात पडत होता का, असे अनेक प्रश्न संशोधकांना पडत आहेत.

अलीकडच्या काळात मेंदूची रचना आणि मानवी वर्तन यांच्या अभ्यासाला गती मिळाली आहे. त्यामुळे या प्राचीन मानवांच्या वर्तनाचा अंदाज वर्तवणे सोपे झाले आहे. युरोपातील Palaeolithic काळाचा अभ्यास करणा-या पुरातत्त्वज्ञांना Neanderthals कसे होते याचे काही तपशील मिळाले आहेत. २ लाख ते ३० हजार वर्षांपूर्वीचे हे पुरावे त्यांच्याविषयी बरीच माहिती सांगतात. आपल्यापैकी ब-याच जणांना माहिती आहे की, सुरुवातीच्या काळात एक वेगळी प्रजाती म्हणून ते उत्क्रांत होत राहिले. पण असे असूनही आधुनिक मानव आणि Neanderthals यांच्यामध्ये ९९.८४ टक्के जनुके समान आहेत. त्यांच्या मेंदूचा आकारही आपल्या मेंदूच्या आकारापेक्षा किंचित वेगळा आणि मोठा होता. त्यामुळेच गेली

कित्येक वर्षे त्यांच्या वर्तनाविषयी, जीवनपध्दतीविषयी कुतूहल होते. Neanderthals आपले अन्न शिकार करून मिळवत असत हे तर निर्विवाद आहे. पण त्यासाठी मोठ्या आकाराच्या सस्तन प्राण्यांची शिकार त्यांना करावी लागे. त्यांची हत्यारे दगडी होती. लाकडी भाल्याच्या टोकावर दगडी बाण लावून ते शिकार करत असत. त्यांनी आपले वेगळे असे शिकारीचे तंत्रही विकसित केले होते. ते ज्या प्रदेशात राहात त्या प्रदेशातील वैशिष्ट्यपूर्ण भूरचनेचा अभ्यास करू न ते गनिमी काव्याच्या पध्दतीने शिकार करत. शिकारीसाठी ते फार दूरच्या मुलुखात जात नसत. एक हजार किलोमीटरपेक्षा अधिक अंतराची मर्यादा त्यांनी क्वचितच ओलांडली असावी.

ज्यांची शिकार करायची ते प्राणी मोठे आणि त्यांना मारण्याची हत्यारे मात्र छोटी, लाकडी भाल्यासारखी अगदीच प्राथमिक अवस्थेतील ! त्यामुळे शिकार करणे हे खूप जिकिरीचे काम असावे. काही पुरातत्त्वीय उत्खननांत Neanderthals च्या हाडांचे नमुने मिळाले आहेत. या हाडांच्या अभ्यासाचा निष्कर्ष सांगतो की, Neanderthal पुरु ष, स्त्रिया आणि मुले तणावग्रस्त जीवन जगत होती. हा तणाव शिकारीचा असावा. शिकारीवरच सर्व गुजराण होत असल्याने ती यशस्वी झाली नाही तर काय, हा प्रश्न प्रत्येक Neanderthal च्या जीवनाला व्यापून राहिला असावा. ते करत असलेल्या शिकारींमध्ये दुखापतींचे, जखमी होण्याचे प्रमाणही मोठे होते. जखमी लोकांची सेवा, शुश्रुषा करू न ते त्यांना पुन्हा समूहात सामील करून घेत असत. हे जखमी लोक पुन्हा दैनंदिन आयुष्य जगू लागत. पण ब-याचदा कमरेच्या खाली दुखापत झालेल्या माणसांना आपल्या पायावर उभे राहता येत नसे. अशा माणसांना सोडून देण्याशिवाय अन्य पर्याय मग इतर Neanderthals पुढे नसे.

गनिमी काव्याचे तंत्र Neanderthals नी चांगलेच आत्मसात केले होते. त्यांच्या शिकारीच्या साधनांतून त्यांची तांत्रिक कौशल्येही दिसून येतात. दगड तासून तो भाल्यावर लावण्याचा शोध त्यांच्याच काळात लागला. पण म्हणून Neanderthals ना निर्मितीक्षम म्हणता येणार नाही. त्यांच्या हत्यारांमध्ये सफाईदारपणा आहे. पण त्यांनी जे आत्मसात केले ते



निरीक्षणातूनच आत्मसात केले असावे. कारण पृथ्वीवरील त्यांच्या या वास्तव्याच्या हजारो वर्षांच्या काळात त्यांचे जीवनमान बदलणारे फार कमी शोध त्यांनी लावले (दगडी भाल्याचा शोध हा त्या शोधांपैकी एक) आधुनिक मानवात आणि Neanderthal मध्ये हा मूलभूत फरक असावा. दीर्घकालीन कार्यपध्दती ही स्मरणशक्तीवर अवलंबून असते तर क्रियाशील संशोधन हे तुलनात्मक विचारावर अवलंबून असते. बहुधा एखादी गोष्ट वर्षानुवर्षाच्या सरावातून आत्मसात करणे इतपतच त्यांच्या आकलनाची झेप असावी.

Neanderthals मध्ये एकत्रित कुटुंबपध्दती होती की विभक्त कुटुंबपध्दती होती हे सांगता येत नाही. पण हे लोक पाच ते दहा लोकांच्या लहान समूहाने राहात असत, असे पुरावे सांगतात. एखादी शिकार यशस्वी झाली तर त्याचा आनंद साजरा कण्यासाटी दुसरे काही गटही त्यांना सामील होत. यावरू न ते वेळप्रसंगी मोठ्या समाजाचे घटक असल्याप्रमाणे वागत हे सिध्द होते. पण अशा प्रसंगांव्यतिरिक्त इतर समुहांमध्ये ते फारसे मिसळत नसत.

Neanderthals चे वास्तव्य असलेल्या ब-याच गुहांमध्ये उच्च प्रतीच्या दगडांचे अवशेष मिळाले आहेत. ज्या ठिकाणी हे दगड मिळाले आहेत, त्या आसपासच्या १०० किलोमीटरच्या परिसरातही असे दगड न आढळल्याने असे दगड त्यांच्याकडे आले कुठून आणि कसे असा प्रश्न संशोधकांना पडला. त्या समूहांचा व्यापारानिमित्ताने किंवा इतर काही कारणाने बाकी समूहांशी संबंध आला होता का याचा शोध संशोधकांनी घेतला. पण त्या संबंधी ठोस पुरावे मिळाले नाहीत. एक शक्यता अशी आहे की, दुस-या एखाद्या समूहाशी लग्नासारखे संबंध प्रस्थापित करताना कदाचित त्या समूहातील मुले किंवा मुली या दगडांची देवाण-घेवाण करत असावेत. एखाद्या प्रदेशातील Neanderthals ची संख्या मर्यादित असेल तर त्यांना दूरवरच्या प्रदेशातील समूहाशी संबंध प्रस्थापित करावे लागत असतील. त्यांच्यामध्ये विवाहसंस्था होती की नाही माहीत नाही. पण स्त्री आणि पुरुष यांच्या जोड्या ठरलेल्या असत आणि त्यांना होणा-या संततीसाठी भविष्यकाळाची तजवीजही ते करत असत.

आपल्या समूहातील लोकांविषयी त्यांना आत्मीयता असावी. कारण, पुरावे सांगतात की मृत्यूपश्चात त्यांच्या मृतदेहांचे ते जतन करत असत. त्यांना इजा पोहोचू नये म्हणून ते त्यांना अरुंद खड्ड्यांमध्ये ठेवून वरून आच्छादन घालत असत. त्यांच्यामध्ये सामाजिक सलोखा निश्चित असावा असेच या उदाहरणांवरुन दिसते. Neanderthals चे आयुर्मान मात्र खूपच कमी होते. फार कमी लोक ३५ वर्षांपेक्षा जास्त काळ जगले असावेत. याचाच अर्थ असा की, त्यांच्यामध्ये आजच्या भाषेत 'वृध्द' गणता येतील अशी माणसे नव्हती. Neanderthals च्या काळातील समाज आजच्यासारखा विस्तारला नव्हता. त्यामुळे आजच्यासारखी अपरिचित लोकांशी देवाण-घेवाण त्यांना करावी लागत नव्हती. अपरिचित लोकांशी संवाद साधण्याची कौशल्ये त्यांच्यात विकसित म्हणूनच झालेली नव्हती. आधुनिक माणूस कुटुंबात रमतो पण त्याचबरोबर एका मोठ्या समाजगटाचे प्रतिनिधित्वही करतो. आजतर त्याच्या समाजाची कक्षा देशाच्या सीमा ओलांडून परदेशापर्यंत पोचली आहे. Neanderthals मध्ये या सगळ्याचा अभाव दिसतो.

Neanderthals मध्ये भाषिक कौशल्ये विकसित झालेली होती. त्यांचे शिकारीचे तंत्र आणि गनिमी कावा प्रत्यक्ष अंमलात आणताना त्यांना या भाषिक कौशल्यांचा उपयोग होत असावा. त्यांच्या भाषेला वाक्यरचनेचे नियमही (Syntax) होते. याचा सर्वांत महत्त्वाचा पुरावा म्हणजे त्यांच्या ब्रोकाच्या भागाची व्यवस्थित वाढ झालेली होती आणि त्यांच्या डीएनएमध्ये आधुनिक मानवाप्रमाणे भाषिक कौशल्यांशी निगडीत असलेले FOXP2 हे जनुक होते. पण या व्यतिरिक्त त्यांच्या भाषेविषयी, लिपीविषयी अधिक माहिती सांगणारे कोणतेही पुरावे सध्या उपलब्ध नाहीत. माणसाची विनोदबुध्दी हा त्याच्या भाषिक कौशल्याचाच आविष्कार असतो. 'विनोदबुध्दी' हे माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. पण विनोद हा केवळ भाषिक कौशल्यांवर अवलंबून नसतो. त्यासाठी वेगळा विचार करून भवतालातील विसंगती शोधणारी विचारशक्ती लागते. त्यांच्याकडे भाषा असली तरी ही विचारशक्ती नसावी. त्यामुळे चार्ली चॅप्लीनचा अंगविक्षेपातून होणारा विनोद त्यांना कदाचित कळला असता, पण पुलंच्या कोट्या मात्र त्यांच्या डोक्यावरुन गेल्या असत्या.हे निश्चित ! ■■



आर्थिक

# वाटचाल दोन तपांची...

'आर्थिक सुधारणा' या शब्दसंहतीमध्ये एक सकारात्मक आशय अध्याहृतच आहे. त्या मानाने 'आर्थिक पुनर्रचना' ही शब्दयोजना अशा कोणत्याही पूर्वग्रहाने भारित नाही. त्यांमुळे, २४ जुलै १९९१ या दिवशी देशाचे अर्थमंत्री या नात्याने डॉ. मनमोहनसिंग यांनी संसदेच्या सभागृहामध्ये सादर केलेल्या अर्थसंकल्पाद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये जे परिवर्तन प्रवाही बनले त्याचे नेमके वर्णन 'आर्थिक पुनर्रचना' या शब्दरचनेद्वारेच होऊ शकेल. २४ जुलै २०१५ या दिवशी भारतीय अर्थव्यवस्थेतील पुनर्रचना पर्वाने त्याच्या वाटचालीच्या पंचविशीमध्ये प्रवेश केला. पुनर्रचना पर्वाच्या या पाव शतकी वाटचालीचे मूल्यमापन आजवर अनेकांगांनी होत आलेले आहे. आजही ती प्रक्रिया खंडित झालेली नाही. त्याच वेळी, आता अनेकांना वेध लागलेले आहेत ते आर्थिक पुनर्रचना पर्वाच्या दुस-या पिढीचे. आर्थिक पुनर्रचनेची ही प्रक्रिया भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये उगम पावली त्या वेळी सर्वसाधारणपणे देशातील बुद्धिजीवी वर्गामध्ये कशा प्रकारची भावना वसत होती याचा मागमूस १९९१ सालानंतर जन्माला आलेल्या पिढ्यांना कदाचित असणार नाही. त्याचप्रमाणे, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अवतरलेल्या आर्थिक पुनर्रचना पर्वाने जगभरात अन्यत्र साकारलेल्या पुनर्रचनेद्वारे कोणते धडे घेतले आणि/अथवा अन्य देशांतील आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमांना भारतीय अर्थव्यवस्थेतील पुनर्रचनांकडून कोणता बोध घेण्यासारखा आहे अथवा असू शकतो, असेही प्रश्न अनेकांच्या मनात डोकवून जात असतात.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये गेली २४ वर्षे सुरु असलेल्या पुनर्रचना कार्यक्रमाचे मूल्यमापन अन्य एखाद्या देशातील पुनर्रचना कार्यक्रमाच्या आरशाद्वारे करणे उचित ठरणार नाही. कारण, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक वैविध्य प्रचंड असणा-या, विशाल लोकसंख्येच्या, बहुपक्षीय राजकीय व्यवस्था नांदणा-या भारतीय वास्तवाशी तुलनीय अशी परिस्थिती अन्यत्र सापडणे दुर्धर व जवळपास अशक्यप्राय ठरावे.

किंबहुना, अर्थतज्ज्ञांमधील एका मोठ्या गटाला अशा प्रकारची तुलना करणे हे केवळ अप्रस्तुतच नव्हे तर अनुचितही वाटते. या गटाच्या मतानुसार, प्रत्येक अर्थव्यवस्थेमध्ये साकारणा-या आर्थिक सुधारणा म्हणा वा आर्थिक पुनर्रचना या एका अर्थाने एकमेवाद्वितीयच असतात. त्याला कारणही तसेच आहे. प्रत्येक देश आणि देशाची अर्थव्यवस्था आपापल्या पुनर्रचनेची विविक्षित अशी दिशा पकडत असते आणि निवडलेल्या त्या दिशेने तिचा प्रवास सुरू होतो. अन्य एखाद्या देशाने तिथे राबविलेल्या आर्थिक पुनर्रचनांचे अनुकरण करणे अथवा त्यांच्या निरीक्षण-परीक्षणाद्वारे त्यांतील काही अंश निवडून त्याची लागवड आपल्या व्यवस्थेमध्ये करणे अशक्यही असते आणि अनाठायीही. कारण, दोन देश अथवा त्यांच्या अर्थव्यवस्थांमधील परिस्थितीमध्ये वरकरणी जरी साम्यस्थळे भरपूर दिसत असली तरी त्या दृश्य पृष्ठभागाच्या खाली असणा-या व्यामिश्र संरचनेमध्ये गुणात्मक स्वरूपाची भिन्नता सघनपणे दडलेली असते. त्यांमुळे, एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर उभ्या ठाकलेल्या एखाद्या विशिष्ठ समस्येच्या निराकरणासाठी तिथे राबविल्या गेलेल्या एखाद्या विविक्षित धोरणाचे तिथे अनुभवास आलेले अनुकूल वा अपेक्षित परिणाम, अन्य एखाद्या देशातील अर्थवास्तवामध्येही व्यवहारात हुबेहूब साकारतील याची शाश्वती अजिबात देता येत नाही. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा एखादा ढाचा एखाद्या अर्थव्यवस्थेमध्ये उपकारक ठरला म्हणून दुस-या एखाद्या देशातही तो तितकाच व तसाच फलदायी ठरेल, याची हमी कोणीही देऊ शकत नसते.

मग, अन्य देशांमध्ये राबविल्या गेलेल्या आर्थिक सुधारणा अथवा आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमांवरून एखादा देश अथवा त्या देशातील धोरणकर्ते काय शिकू शकतात, असा प्रश्न कोणाच्याही मनात उद्‌भवेल. असा प्रश्न मनात निर्माण होणे साहजिकच आहे. त्यांत अनैसर्गिक काहीच नाही. आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर जे प्रश्न उभे ठाकलेले आहेत आणि ज्यांच्या निराकरणासाठी आर्थिक घडी मुळातूनच बदलण्याचा घाट घालायचा आहे तशाच प्रकारचे प्रश्न साधारणपणे ज्या देशातील अर्थव्यवस्थेच्या पुढ्यात अवतरलेले आहेत अथवा होते त्या देशाने जी धोरणे त्यांवेळी राबविली तशा प्रकारची धोरणे आपण आपल्या अर्थव्यवस्थेत राबविली तर



आपल्या समस्यांवर तोडगा निघण्याच्या दिशा उजळू शकतील, अशा प्रकारची विचारमालिका देशातील धोरणकर्त्यांच्या मनात उगम पावण्यापुरताच अन्य देशांचा तौलनिक अभ्यास उपयोगी ठरत असतो.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये राबविल्या गेलेल्या आर्थिक विकासाच्या केंद्रीय नियोजनप्रधान प्रारूपाच्या यथार्थ उपयुक्ततेबाबत म्हणा वा प्रस्तुततेबाबत म्हणा, पुनर्विचार करण्याची गरज भारतातील बुद्धिजीवी वर्गाला व धोरणप्रक्रियेवर प्रभाव असणा-या समाजघटकांना वाटायला लागली ती १९८०च्या दशकापासून. त्याला कारणे दोन. खरे म्हणजे दोन घटना. १९७८ साली चीनने शासनप्रणीत बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचा केलेला अंगीकार ही झाली त्यांतील पहिली घटना. तर, बलाढ्य गणल्या जाणा-या सोव्हिएत संघराज्याचे विसाव्या शतकाच्या अखेरच्या चरणात घडून आलेले विघटन ही झाली त्यांतील दुसरी घटना. या दोन्ही घटनांचे पडसाद तत्कालीन वैश्विक व्यवस्थेमध्ये खोलवर आणि दूरगामी उमटले.

आर्थिक विकासाच्या धोरणासंदर्भातील कडव्या राष्ट्रवादी भूमिकेचा वा राष्ट्रवादी मानसिकतेचा पगडा असलेल्या विकासविषयक दृष्टीच्या प्रस्तुततेबाबत आपल्या देशातील धोरणकर्त्यांना अंतर्मुख बनवले ते चीनने १९७८ साली अंगिकारलेल्या निर्यातोन्मुख व निर्यातप्रधान अशा पुनर्रचना उपक्रमाने. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी अर्थव्यवस्थेचे दरवाजे खुले करण्याच्या धोरणाचे सुभग परिणाम चीनच्या उदाहरणाने जगासमोर मांडले. त्याच्याच आगेमागे पूर्व आशियाई देशांनी तसेच आग्नेय आशियाई देशांनीही १९६० व १९७०च्या दशकात निर्यातप्रधान विकासविषयक प्रणालीचे आर्थिक विकासासंदर्भातील लाभ वैश्विक समुदायासमोर मांडलेले होते. मात्र, चिमुकल्या देशांनी राबविलेली ती धोरणे भारतासारख्या विशाल देशाच्या संदर्भात कितपत संयुक्तिक व प्रस्तुत ठरतील म्हणून आपल्या वैचारिक विश्वात त्यांसंदर्भात उपेक्षेचा सूर उमटला. परंतु, चीनसारख्या लोकसंख्याबहुल व आकाराने बलदंड असलेल्या अर्थव्यवस्थेनेही तशाच प्रकारच्या धोरणाचा अंगीकार केल्यानंतर आपल्या देशातील मानसिकताही बदलाच्या तोंडाकडे लक्षणीयरीत्या झुकली. *(कृपया पृष्ठ क्रमांक २४ पाहावे)*

# 'साथीं'चे उत्खनन

इटलीतील Tuscany प्रांतातील Badia Pozzeveri हे मध्ययुगीन चर्च गेली काही वर्षे वेगळ्याच कारणाने चर्चेत आहे. या चर्चमध्ये एक हजार वर्षांपूर्वीचे कबरस्तान आहे. मागील चार-पाच वर्षांपासून इथे अमेरिकेतील ओहायो विद्यापीठातील संशोधक Clark Spencer Larsen आपल्या विद्यार्थ्यांसमवेत संशोधन करण्यासाठी येत आहेत. १९८० च्या उत्तरार्धात कॉलराच्या साथीत मोठ्या संख्येने मृत्युमुखी पडलेल्या लोकांचे दफन या कबरस्तानात करण्यात आले होते. Larsen आणि त्यांचे विद्यार्थी या मृतदेहांचा अभ्यास करत आहेत. त्यासाठीच ते प्रत्येक उन्हाळ्यात या ठिकाणी येऊन मृतदेहांचे उत्खनन करतात. येथील मृतदेह त्यांच्यापासून जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून दफन करताना कडुनिंबाच्या पानात गुंडाळण्यात आले होते. कडुनिंबाच्या आच्छादनामुळे हाडांना इजा पोहोचत नाही. त्यांचे उत्तम जतन होते. Larsen म्हणतात की, एखाद्या रोगाने मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या अवशेषांचे इतके उत्तमरीत्या केलेले जतन फार क्वचित पाहायला मिळते. म्हणूनच त्यांच्या अभ्यासातून बरेच काही हाती लागेल अशी आशा त्यांना वाटते.

या अवशेषांच्या हाडांमध्ये Larsen आणि त्यांच्या विद्यार्थ्यांना कॉलराच्या जंतूंचे डीएनए मिळाले आहेत. या रुग्णांचा मृत्यू झाला त्या वेळी हे जंतू त्यांच्या शरीरात होते. ज्यांच्यामुळे कॉलरा होतो असे Vibrio cholerae नावाचे हे जीवाणू असावेत, असे Larsen यांचे म्हणणे आहे. या जीवाणूंच्या अभ्यासातून कॉलराची उत्क्रांती कशी झाली आणि तो १८ व्या शतकात युरोपभर कसा पसरला या विषयीची माहिती यातून मिळेलच शिवाय या जीवाणूंचे आजचे स्वरूप समजायलाही मदत होईल. त्यांचा प्रतिकार करण्यासाठी काही उपाययोजनाही करता येईल, असे Larsen



यांचे म्हणणे आहे. ते आणि त्यांचे विद्यार्थी सध्या येथील आणखी काही थडग्यांचे उत्खनन करण्यात व्यग्र आहेत. या थडग्यांतील अवशेष हे ब्यूबॉनिक प्लेगने मृत्युमुखी पडलेल्या लोकांचे आहेत. १४ व्या शतकात आशिया आणि युरोपमध्ये या साथीच्या रोगाने थैमान घातले होते आणि त्यात लाखो लोकांचा मृत्यू झाला होता.

पुरातत्त्वीय अवशेषांच्या आधारे आजच्या संसर्गजन्य रोगांचा अभ्यास करणे ही अलीकडच्या काळातील नवीन संशोधनपध्दती आहे. अशा प्रकारे मानवी अवशेषांचा अभ्यास करणारे Larsen हे पहिलेच संशोधक नाहीत. आजवरच्या इतिहासात संसर्गजन्य रोगांच्या साथीत लक्षावधी लोक मृत्युमुखी पडले. या रोगांचे जीवाणू/विषाणू ठराविक काळाने त्यांचे स्वरूप बदलून माणसाच्या आरोग्यावर परिणाम करतच राहिले. त्यांचा पूर्ण बिमोड करणे आपल्याला शक्य झाले नाही. तेव्हा या जंतूंचे मूळ स्वरूप जाणून घेतले आणि काळानुसार त्यांच्या स्वरूपात कसा बदल होत गेला याचा अभ्यास केला तर कदाचित आपण त्यांचे समूळ उच्चाटन करू शकू असे संशोधकांना वाटले आणि त्यातूनच या पुरावशेषांच्या अभ्यासाची कल्पना पुढे आली. अशा प्रकारे पुरावशेषांचा अभ्यास करून संसर्गजन्य रोगांचा इतिहास जाणून घेणा-या विद्याशाखेला Palaeopathology असे नाव आहे. हाडे, दात, दातांच्या पेशी यांच्या अवशेषांचा अभ्यास करून एखाद्या रोगाचा इतिहास या विद्याशाखेमध्ये जाणून घेतला जातो आणि त्यावरची भविष्यकालीन उपाययोजना ठरवली जाते. आजचे बरेच संशोधक त्यांच्या अभ्यासासाठी या शाखेचा उपयोग करत आहेत.

हाडांची झीज आणि क्षयरोग यांसारख्या रोगांच्या अस्तित्वाच्या खुणा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे आपल्या हाडांवर कायमस्वरूपी उमटल्या जातात. या व्याधींचा इतिहास माणसाच्या अस्थींमध्ये नोंदलेला असतो. जैवतंत्रज्ञानासारखी आधुनिक शास्त्रे या रोगांचे मूळ स्वरूप समजून घेण्यासाठी, त्यांचा अधिक अभ्यास करण्यासाठी मदत करतात. University College London च्या Helen Donahue म्हणतात की, डीएनएमुळे साथीच्या रोगांचा ऐतिहासिक पुरावा मिळतो. त्यांचा संसर्ग किती प्रमाणात झाला होता, किती दूरच्या प्रदेशात हा संसर्ग पसरला होता, याची माहिती मिळते.

या रोगांचा संसर्ग समाजातील कोणत्या थरांत झाला होता, यावरून त्या वेळच्या सामाजिक संदर्भांची, पर्यावरणाची कल्पनाही येते. उदाहरणार्थ, कुष्ठरोगाच्या संसर्गाचे प्रमाण ग्रामीण लोकांमध्ये तुलनेने जास्त तर, क्षयरोग हा शहरांशी संबंधित असावा असे आजवरची निरीक्षणे सांगतात.

क्षयरोग आणि कुष्ठरोग यांच्या इतिहासाचा सविस्तर अभ्यास Donahue यांनी केला आहे. या विषयातील अभ्यासावर आधारित त्यांचा एक शोधनिबंध *New England Journal of Madicine* मध्ये प्रसिध्द झाला आहे. हंगेरीतील एका चर्चच्या भुयारी जागेतील मानवी अवशेषांच्या अभ्यासावर त्यांचा हा शोधनिबंध आधारलेला आहे. या मृतदेहांचे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात त्या ठिकाणी दफन करण्यात आले होते. भुयारी जागेतील विशिष्ट हवामानामुळे या मृतदेहांचे नैसर्गिकरित्या 'ममीं'मध्ये रूपांतर झाले. बहुतांश मृतदेहांना क्षयरोगाचा संसर्ग झाला होता. Donahue म्हणतात, "बहुतेक सर्वांना एकापेक्षा जास्त प्रकारच्या MTB च्या जंतूंचा संसर्ग झाला होता. या सर्वच व्यक्ती युरोपीय वंशाच्या होत्या. आज अशा प्रकारचा संसर्ग आफ्रिका खंडाच्या सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील प्रदेशांत पाहायला मिळतो आणि एक अंदाज असा आहे की, अशा प्रकारच्या संसर्गाला एचआयव्हीचा विषाणू/ जीवाणू कारणीभूत ठरतो"

१८ व्या शतकातील संसर्गजन्य रोगाला बळी पडलेल्या लोकांचे नमुने Donahue यांनी गोळा केले आहेत. त्यांना असे दिसून आले की, काही वेळेला एखाद्या संसर्गजन्य रोगाने एकाच प्रदेशातील किंवा एकाच कालखंडातील लोकांचा बळी जात नाही. इटलीतील Mauro Rubini यांनी या विषयात महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे. लहान वयात कुष्ठरोग झालेल्या दोन व्यक्तींच्या 'ममीं'चा त्यांनी अभ्यास केला. यातील एक 'ममी' इसवी सनपूर्व दुस-या-तिस-या शतकातील तर दुसरी 'ममी' इसवी सनपूर्व नवव्या ते १९ व्या शतकातील होती. याचा अर्थ असा की, माणूस जगभर स्थलांतर करताना जसजसा उत्क्रांत होत गेला तसे हे जीवाणू/विषाणूही त्याच्याबरोबर उत्क्रांत होत गेले. दोन वेगवेगळ्या कालखंडांतील अवशेषांचा असा अभ्यास खूप कमी जणांनी केला आहे. त्या दृष्टीने Rubini यांचे



संशोधन महत्त्वपूर्ण आहे. ब-याचदा अवशेषांतून मिळालेल्या जंतूंचे डीएनए त्या रोगाविषयीच्या नवीन सिध्दांताला जन्म देतात. Kirsten Bos या कॅनडातील एका विद्यापीठातील मानववंशशास्त्रज्ञ. त्यांनी लंडनमधील पुरावशेषांमधून डीएनएचे काही नमुने गोळा केले. त्यांच्या अभ्यासातून त्यांना दिसून आले की, ब्यूबॉनिक प्लेग हा Yersinia pestis या घातक जीवाणूमुळे होतो. मध्ययुगात या रोगाच्या साथीमध्ये हजारो लोकांचा बळी गेला होता. इबोलाच्या जीवाणूसारखा एखादा जीवाणू या रोगाला कारणीभूत असावा असे तोपर्यंत मानले जात होते. पण Bos यांच्या संशोधनाने ब्यूबॉनिक प्लेगच्या जीवाणूच्या स्वरूपाविषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. त्यांनी पुढे असेही सिध्द केले की, आधुनिक काळातील रोगांच्या जंतूंचे वारस हे ब्यूबॉनिक प्लेगच्या वारसांपासूनच उत्क्रांत झाले आहेत. जे संसर्गजन्य रोग समाजात आपले अस्तित्व आजही टिकवून आहेत, त्यांच्या जंतूंचा अभ्यास करण्यासाठी हा अभ्यास नक्कीच उपयोगी पडणार आहे. २० वर्षापूर्वी सुरतेमध्ये आलेली प्लेगची मोठी साथ किंवा जगात आलेल्या अनेक लहान मोठ्या संसर्गजन्य रोगांच्या साथी थोपवायच्या असतील तर त्यांना कारणीभूत असलेल्या जंतूंचा इतिहास जाणून घेऊन त्यांना अटकाव करणे, हा कदाचित प्रभावी उपाय ठरू शकेल. या अभ्यासातून आपल्याला मानवी इतिहासाविषयीही काही धागेदोरे मिळतील. संसर्गजन्य रोगांना कारणीभूत असणारे जीवाणू जर माणसाबरोबरच उत्क्रांत झाले असतील तर त्यांचा अभ्यास माणसाने वेगवेगळ्या खंडांत केलेल्या स्थलांतराविषयीही बरीच माहिती सांगू शकेल.

## खावे त्यांच्या वंशा...

भारतात खाद्यपदार्थांची परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे. कुठल्याही ठिकाणची खाद्यपरंपरा ही त्या प्रदेशाच्या हवामानावर, तेथे पिकणा-या धान्यांवर ठरते. असे असले तरी काही ठराविक अन्नघटक माणसाच्या आहारात असणे आवश्यक असते. त्यांत वेगवेगळ्या प्रकारच्या डाळी, धान्ये, कडधान्ये यांचा समावेश होतो. सध्याच्या काळात डाळी, धान्ये आणि कडधान्ये एकत्र करून केलेल्या पदार्थांचे (Multigrain)

महत्त्व वाढलेले आहे. खाद्यपदार्थ बनवणा-या कंपन्याही वेगवेगळ्या प्रकारची पिठे, बेकरीचे पदार्थ, नूडल्स, बिस्किटे असे पदार्थ जन्माला घालून लाखो रुपयांचा नफा कमवत आहेत. आपली अन्नपदार्थांची परंपरा पाहिली तर, आपल्याकडेही पूर्वापार 'मल्टिग्रेन' पदार्थ बनत होते याचे दाखले काही ग्रंथांत मिळतात. आजचे आघाडीचे आहारतज्ज्ञ आणि खाद्यपदार्थांच्या इतिहासाचे जाणकार के. टी. अचय्या म्हणतात की, पदार्थाचे पोषणमूल्य आणि प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या डाळी, धान्ये, कडधान्ये एकत्र करण्याची परंपरा आपल्याकडे आर्यांच्या काळापासून चालत आलेली आहे. आपल्याकडे डाळी आणि धान्य एकत्र केलेले बरेच पदार्थ आंबवले जातात. त्यामुळे ते पचायला हलके तर होतातच, शिवाय त्यांचे पोषणमूल्यही वाढते. आजच्या काळातील डोसा, इडली, ढोकळा ही प्राचीन काळातील पदार्थांची आधुनिक रूपे आहेत. पण ज्याला खरोखर 'प्राचीन' म्हणावा असा एकमेव पदार्थ आजच्या काळातही आपले अस्तित्व टिकवून आहे आणि तो म्हणजे 'अडाई'! तांदुळ आणि चार प्रकारच्या डाळींचे समप्रमाणात मिश्रण असलेला हा पदार्थ अंशतः तळला जातो. अडाईचा पहिला उल्लेख 'सिलाप्पडीकरम' या पहिल्या शतकात लिहिलेल्या तमिळ महाकाव्यात आढळतो. तिस-या आणि सहाव्या शतकाच्या दरम्यान लिहिल्या गेलेल्या वाङ्मयात त्याचे वर्णन 'समुद्रकिनारी विकला जाणारा पदार्थ' असे केलेले आहे. आजच्या काळात बनवली जाणारी अडाई किंचित जाडसर आणि फुगीर असते. सकाळच्या न्याहरीसाठी हा उत्तम पर्याय समजला जातो. दक्षिणेकडच्या उपहारगृहांत हा पदार्थ क्वचितच मिळतो, कारण तो तयार करण्यासाठी वेळ लागतो. या उलट अडाई घरी बनवल्याने त्यातील डाळी आपल्या आवडीनुसार घेता येतात. तांदुळ आणि डाळ यांच्या प्रमाणात फरक असल्यामुळे प्रत्येक घरची अडाई करण्याची पध्दत साहजिकच वेगवेगळी असते. आजच्या काळात अडाईवर कांदा, टोमॅटो, अळंबी आणि ऑलिव्ह घालून 'पिझ्झा बेस' म्हणूनही त्याचा वापर करतात. पण सकाळच्या न्याहारीला गरमागरम अडाई आणि लोण्याचा गोळा मटकावून जी क्षुधाशांती होते तिचा आनंद हा पिझ्झा खाऊन मिळणे शक्यच नाही ! ■■



*(पृष्ठ क्रमांक १८ वरून)*

आर्थिक प्रगतीच्या समाजवादप्रधान वैचारिक व्यूहाच्या सक्षमतेबाबत व परिणामकारकतेसंदर्भात भारतीय विचारविश्वामध्ये नव्याने चिंतन सुरू झाले ते सोव्हिएत संघराज्याच्या विघटनामुळे. केंद्रीय नियोजनपद्धतीवर असलेला भर आणि समाजवादी विचारसरणीचे व्यवच्छेदक लक्षण असलेला सरकारी क्षेत्राचा आर्थिक संरचना व अर्थविश्वातील वरचष्मा यांची प्रस्तुतता सोव्हिएत संघराज्याच्या पतनामुळे प्रकर्षाने चिंतनविषय बनली. वैश्विक परिमाण असलेल्या या दोन घटनांमुळे मुळातच भारतीय धोरणकर्ते अंतर्मुख बनलेले होते. १९९०सालापासून क्रमाने उत्क्रांत होत गेलेल्या परकीय चलनाच्या तुटवड्याच्या संकटाला या धोरणविश्वाने दिलेला प्रतिसाद म्हणजे १९९१ सालापासून भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आगेकूच करत राहिलेले आर्थिक पुनर्रचना पर्व.

भारतीय व्यवस्थेमध्ये १९९१ ते २०१५ या २४ वर्षांदरम्यान साकारत आलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची वैचारिक मूस ही अशी क्रमाने प्रगल्भ आणि पक्व होत आलेली होती. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५** **किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

उजळणी

# स्मरण, प्रेरक आणि मार्गदर्शक बोलांचे...

साधारणपणे १९३६ सालच्या आगेमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकंदर तीन आघाड्यांवर वैचारिक संक्रमणाला चालना देताना दिसतात. धर्मांतर करण्याबाबतच्या त्यांच्या आंतरिक खळबळीला याच काळात ठोस आकार प्राप्त होत होता. त्याच वेळी, आपण एकट्याने धर्मांतर केल्याने फार काही साध्य होणार नाही, याची पुरेपूर कल्पना असल्याने धर्मांतरासाठी समाजबांधवांची मानसिक-वैचारिक जडणघडण करण्यासाठीही त्यांनी वाणी व लेखणी परजलेली होती. अंतर्मुख होण्यास समाजबांधवांना भाग पाडणारे अनेकानेक मुद्दे बाबासाहेब त्यांच्या ठिकठिकाणच्या भाषणां-व्याख्यानांदरम्यान त्या काळात मांडत राहिले. ज्या समाजव्यवस्थेने आपल्याला पिढ्यान्‌पिढ्या अ-मानवी वागणूक दिली त्या व्यवस्थेसंदर्भात भविष्यात आपली भूमिका काय असावी, यांबाबत आपल्या समाजबांधवांच्या मनात विचारांचे आवर्त उठवून देताना ते दिसतात. तर, तिसरीकडे प्रांतिक मंडळांच्या निवडणुकांमध्ये राखीव जागांवर उभ्या करावयाच्या उमेदवारांच्या निवडीपासून ते पात्र उमेदवारांनाच आपल्या समाजबांधवांनी निवडून द्यावे यासाठी त्यांची भूमिका तयार करण्यात ते गुंतलेले राहतात. त्या काळात बाबासाहेब बजावत असलेल्या त्या तिहेरी भूमिकेचे प्रतिबिंब पुढील वेच्यांत पडलेले दिसेल.

### *(१) मानसिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे...*

*"सामाजिक स्वातंत्र्य जोपर्यंत तुम्हाला प्राप्त झाले नाही तोपर्यंत तुम्हाला कायद्याने कितीही स्वातंत्र्य दिले तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही. तुम्हाला शारीरिक स्वातंत्र्य आहे, असे काही लोक सांगतील. तुम्हाला कायद्याची मनाई नसेल तिकडे जाता येते, कायद्याची मनाई नसे त्या प्रकारे बोलता येते हे खरे, परंतु या स्वातंत्र्याचा काय उपयोग आहे ? मनुष्यमात्राला जसे शरीर आहे तसेच मनही आहे. जितकी शारीरिक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे तितकीच मानसिक स्वातंत्र्याचीही आवश्यकता*



*आहे. नुसत्या शारीरिक स्वातंत्र्याचा काही उपयोग नाही. महत्त्व आहे ते मानसिक स्वातंत्र्याला. खरे म्हटले असता शरीराचे स्वातंत्र्य कशासाठी असते ? ज्याला त्याला मनसोक्त व्यवहार करता यावा एवढ्याच करता आहे. कैद्याच्या पायातील बेड्या काढून त्याला मोकळे करण्याचा मतलब काय ? हेतू एवढाच की त्याने बाह्य जगात मोकळ्या मनाने वावरून आपल्या अंगी असलेल्या कर्तबगारीचा पूर्ण फायदा घ्यावा म्हणून. परंतु ज्या माणसाचे मन स्वतंत्र नाही त्याला असल्या बाह्यात्कारी स्वातंत्र्याचा काय उपयोग ? मानसिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो मोकळा असून गुलाम आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो जरी कैदी नसला तरी तो तुरूंगात आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो जिवंत असून मेला आहे. मनाचे स्वातंत्र्य ही जिवंतपणाची साक्ष आहे. परंतु मानसिक स्वातंत्र्य वसत आहे, त्याचा लोप झालेला नाही, याचा पुरावा काय ? मानसिक स्वातंत्र्य कोणाला आहे असे म्हणता येईल ? जो आपली बुद्धी जागृत ठेऊन आपले हक्क काय, आपले अधिकार काय व आपले कर्तव्य काय याची जाणीव करून घेतो त्याला मी स्वतंत्र म्हणतो. जो परिस्थितीचा दास झाला नाही, जो परिस्थितीला आपल्या कह्यात आणण्यास सिद्ध असतो, तो माणूस स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो रूढीच्या स्वाधीन झाला नाही, जो गतानुगतिक बनला नाही, ज्याच्या विचाराची ज्योत विझली नाही तो स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो पराधीन झाला नाही, जा दुस-याच्या शिकवणीने वागत नाही, जो कार्यकारणभाव ध्यानात घेतल्याशिवाय कशावर विश्वास ठेवित नाही, जो आपल्या हक्कांचा अपहार केला असता, त्याच्या रक्षणार्थ दक्ष असतो, जो प्रतिकूल लोकमताला घाबरून जात नाही, दुस-याच्या हातचे बाहुले न होण्याइतकी बुद्धी, स्वाभिमान ज्याला आहे तोच माणूस स्वतंत्र आहे, असे मी समजतो. जो आपल्या आयुष्याचे ध्येय व आपल्या आयुष्याचा व्यय दुस-याने घालून दिलेल्या आज्ञेप्रमाणे ठरवित नाही, जो आपल्या बुद्धीनुसार आपल्या आयुष्याचे ध्येय काय असावे व आपले आयुष्य कोणत्या कार्यात व कशा रीतीने व्यतीत करावे हे आपले आपण ठरवितो, सारांश जो सर्वस्वी स्वाधीन आहे, तोच माणूस स्वतंत्र आहे, असे मी समजतो ".*

*(२) जो मनुष्य कायदेमंडळात निवडून द्याल तो लायक असला पाहिजे....*

*"आपली सामाजिक सुधारणा कायदे करून होणार नाही. परंतु आपली आर्थिक, शैक्षणिक व औद्योगिक उन्नती कायद्याने करून घेता येईल. त्यांच्यावरच तुम्हाला अवलंबून राहिले पाहिजे. आपल्या उन्नतीचे कायदे कसे घडून येतील हे आपण कायदेमंडळात ज्या लायकीचे सभासद निवडून देणार आहोत त्यांच्यावर अवलंबून राहणार आहे. आपण जे प्रतिनिधी निवडून देऊ ते आपल्या समाजहिताला जागणारे आहेत किंवा नाहीत, हे पाहिले पाहिजे. जे आपल्या समाजहिताच्या दृष्टीने कायदेमंडळात कायदे घडवून आणतील अशाच लोकांना तुम्ही निवडून द्या. आतापर्यंत आपल्याला इंग्रज सरकारकडे दाद मागावी लागत असे, पण या नव्या राज्यघटनेनुरूप इंग्रज सरकारचे हातात काही राहिले नाही. तुम्ही जे प्रतिनिधी कायदे कौन्सिलात पाठवाल त्यांच्यावरच तुम्हाला अवलंबून राहिले पाहिजे. तुम्हाला ज्या काही अडचनी भासतील त्या नाहीशा करण्याकरता त्यांना तुम्ही भाग पाडले पाहिजे. नुसते प्रतिनिधी कायदे कौन्सिलात पाठवून तुमचे भागणार नाही. निवडून गेल्यावर ते काय करतात यावर देखील तुम्ही नजर ठेवली पाहिजे. मी तुम्हाला पुन्हा पुन्हा सांगतो की तुम्ही जो मनुष्य कायदेमंडळात निवडून द्याल तो लायक असला पाहिजे....कायदे मंडळात तुमचे हित कोण करू शकेल हेच तुम्ही मुख्यतः पाहिले पाहिजे. विनाकारण गावचा, तालुक्याचा, जिल्ह्याचा अभिमान धरून बसू नका. जर तुम्ही उमदेवार निवडून देतेवेळी दक्षता बाळगली नाही तर तुमच्या सर्व कार्याचाच नाश होणार आहे. दुसरी गोष्ट मला आपणास सांगितली पाहिजे ती ही की एकटा मनुष्य कायदेमंडळात काही करू शकत नाही.... एकटा-दुकटा मनुष्य कायदेमंडळात काही करू शकत नाही. एकजुटीने, संघटितपणाने तुम्ही निवडून दिलेले प्रतिनिधी वागतात किंवा नाही हे पाहणे तुमचे कर्तव्य आहे. पक्षाला धरून न वागणा-या माणसाला निवडून दिल्यास काही हित होणार नाही. नुसता हुशार आहे एवढे बघून चालणार नाही. त्याला पक्ष आहे किंवा नाही हेही तुम्ही पाहिले पाहिजे... म्हणून आपण निवडून दिलेले सभासद कायदेमंडळात एकजुटीने कसे राहतील याबद्दल योजना तयार करावयास पाहिजे.".*



***(३) पक्षाच्या हिताकरिता लायक माणसालाच निवडून दिले पाहिजे....***

*"मी निवडलेल्या उमेदवारांबद्दल जी काही थोडीशी टीका केली जात असेल त्याबद्दल मला मुळीच खंत वाटत नाही किंवा आश्चर्य वाटत नाही. कारण त्या मानाने प्रतिकूल असे मत फारसे दृष्टोत्पत्तीस येत नाही. यावरून माझी उमेदवारासंबंधीची निवड समाजास पसंत पडली आहे, असे म्हणावयास मुळीच हरकत नाही. मी ज्या माणसांची निवड केली त्यात कोणी माझे नातेवाईक, चुलते, मुलगे, जावई किंवा व्याही वगैरे कोणी नाहीत. मी त्यांचा सर्वप्रकारचा विचार करून, तीन गोष्टींची कसोटी लावून त्यात जे कसोटीस उतरले त्यांचीच निवड केली आहे. पहिली कसोटी म्हणजे इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान. कारण तेथे सर्व कामकाज इंग्रजीतूनच चालणार आहे. आपापल्या जिल्ह्यातर्फे, तालुक्यातले जाच-त्रासादी गा-हाण्यांचे प्रश्न असेंब्लीमध्ये इंग्रजीतून विचारता आले पाहिजेत. म्हणून उमेदवार इंग्रजी जाणणारा पाहिजे. दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे उमेदवार वयाने तरूण असला पाहिजे. म्हाता-या मंडळींना काही तेथे पालखीतून बसवून न्यावयाचे नाही. एखाद्या असेंब्लीच्या सभासदाला असेंब्लीचे कामकाज चालू असताना एखाद्या खेड्यातून तिकडीची तार आली तर त्याला तेथे वेळ पडल्यास पायी चालत जाता आले पाहिजे. रात्री-बेरात्री आपल्या जिल्ह्यातील लोकांसाठी फिरता आले पाहिजे. ते कार्य एखाद्या म्हाता-या, संधीवाताने जखडलेल्या कौन्सिलरच्या हातून कदापिही होणार नाही. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आपल्या पक्षाचा उमेदवार पक्षाच्या शिस्तीखाली राहिला पाहिजे. पक्षाच्या नियमानुसार वागून त्याच्या अंगात कार्य करण्याची धमक पाहिजे आणि तो पक्षाकरिता निःस्वार्थबुद्धीने काम करणारा पाहिजे. स्वार्थी माणसाला की कवडीचीही किंमत द्यायला तयार नाही.... मला भाऊबंदकीकडे किंवा जिल्ह्याच्या दुराभिमानाकडे अथवा वतनदारीकडे लक्ष द्यावयाचे नाही. नुसत्या नावावर लायकी किंवा महत्त्व अवलंबून नाही. तर ते कामावर अवलंबून आहे.... तेव्हा आपण तालुक्याचा, गावचा किंवा जिल्ह्याचा दुराभिमान सोडून तुम्ही आपल्या पक्षाच्या हिताकरिता लायक माणसालाच निवडून दिले पाहिजे....".*

■■

**प्रमुख संदर्भ**

**(A) Magazines -** (1)New Scientist : 23 November, 2013 (2) New Scientist : 14 January, 2012 (3) Down To Earth,16-30 April, 2015 (4) Down To Earth16-31 March, 2015

**(B) Books/Reports -** (1) Journal of Anatomy

(2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणेः भाग १ : १९२० ते १९३६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे : खंड १८, भाग १, २००२, पृष्ठ क्रमांक ४२४, ४६६-६७ आणि ४९९-५००. (२) UNDERSTANDING REFORMS: Post 1991 India, Suresh P. Tendulkar and T. A. Bhavani, Oxfor University Press, 2007. **(C) Websites -** (1)http: // www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC2815939/ ■■

**Poverty in India**

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

**कर्ता-करविता**

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रु पये**



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८०/ - रुपये**

**त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

# ग्रंथालयातील पुस्तके

**Krishnakath, Yashwantrao Chavan (Translated by - Gayatri Pagadi) , Rohan Prakashan, Mumbai, 2012, pp. 304, Price Rs. 395/-**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे जितके मुत्सद्दी आणि द्रष्टे राजकारणी होते तितकेच ते कलेचे आणि साहित्याचे जाणकार होते. राजकारणात राहूनही त्यांनी आपल्या साहित्यिक जाणिवा टवटवीत राखल्या, समृध्द केल्या. त्यांच्या चिंतनशील, पारदर्शी आणि संपन्न व्यक्तिमत्वाची झलक आपल्याला त्यांच्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात पाहायला मिळते. या पुस्तकाला मराठी साहित्यामध्ये आता अभिजात वाङमयाचा दर्जा प्राप्त झाला आहे असे म्हणायला हरकत नाही. कलेवर, साहित्यावर, जीवनावर प्रेम करणार यशवंतरावांचे व्यक्तिमत्व या पुस्तकातून समोर येतेच, शिवाय। एक सामान्य घरातील मुलगा देशाच्या राजकारणातील आघाडीचे नेता कसा बनला याचा विलक्षण प्रवासही या पुस्तकात वाचायला मिळतो. यशवंतराव हा प्रवास आपल्या सुंदर, ओघवत्या आणि प्रत्ययकारी शैलीत वर्णन करतात. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वातील हे सुसंस्कृत आणि अभिरु चीसंपन्नतेचे पैलू आजवर केवळ मराठी भाषिकांनाच ठाऊ क होते. या विलक्षण व्यक्तिमत्वाचा परिचय अमराठी भाषिकांनाही व्हावा या हेतूने त्यांचे हे पुस्तक 'कृष्णाकाठ' याच नावाने अलीकडेच इंग्रजीमध्ये प्रकाशित झाले आहे. गायत्री पगडी यांनी या पुस्तकाचा तितक्याच प्रवाही भाषेत अनुवाद केला आहे. त्यांच्या इंग्रजी भाषेचे अस्सल मराठीपण हे खरे तर या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. सध्याची तरू ण पिढी मराठी वाचन क्वचितच करते. त्यांची या अभिजात पुस्तकाशी, त्यातील विचारांशी आणि यशवंतरावांसारख्या सुजाण व्यक्तिमत्वाशी आमच्या तरू णांची ओळख व्हावी हा हेतू या अनुवादामागे असावा. त्याअर्थाने हा अनुवाद आजच्या पिढीच्या वैचारिक जाणिवा समृध्द करेल.

■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2013-2015
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**